**नि.दि.दा.क.248/2018**
**गोविंद वि. नामदेव**

## नि.53 वरील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिदावा वादी यांनी पुरावा न दिल्याने त्यांचेविरुध्द नि.1 वर पुरावा बंद (evidence close) आदेश करण्यात आला होता. सदरचा आदेश बाजुला करण्यासाठी (set-aside) दाखल केलेला आहे. त्यावर विरुध्द पक्षाचा लेखी खुलासा मागविण्यात आला.

**2.** युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता प्रतिदावा वादीने प्रस्तुत दावा हा कायमचा मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केला. सदर दाव्यात प्रतिदावा वादींना अनेक वेळा संधी देवून सुध्दा त्यांनी त्यांचा पुरावा दाखल केला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द नि.1 वर पुरावा बंदचा आदेश पारीत केलेला आहे. परंतु असे जरी असले तरी वादींना नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमुद केलेले कारण व कायदेशीर बाब विचारात घेता वादींना त्यांच्या बचावाची संधी देणे आवश्यक आहे. परंतु असे जरी असले तरी प्रस्तुत दावा हा सन 2018 चा आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रतिदावा वादींवर खर्च लादणे न्यायोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

1. प्रतिदावा वादींचा अर्ज नि.क्र.53 प्रतिवादींना एकुण रक्कम रु.500/-(अक्षरी रुपये पाचशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

2. सदर आदेश खुल्या न्यायालयात देण्यात आला.

Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2025.01.13 17:29:40 +0530

**(आर.डी.खराटे)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
निलंगा

दि.13.01.2025